| | |
|---|---|
| MHPU040241532021 | दाखल दिनांक : १७/०७/२०२१ |
| | नोंदणी दिनांक: १७/०७/२०२१ |
| | निकाल दिनांक : २७/०४/२०२६ |
| | कालावधी : ०४ व. ०९ म. १० दि. |

**विद्यमान प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१, पुणे**
**(पिठासीन अधिकारी — डॉ. जी. आर. डोरनलपल्ले)**

**नियमीत फौजदारी खटला क्र.२४४७/२०२१** **निशाणी क्र.१२**

**भाग 'अ'**

| | |
|---|---|
| तक्रारदार/फिर्यादी | **महाराष्ट शासनतर्फे**<br>**उत्तमनगर** पोलीस स्टेशन पुणे. |
| अभियोग पक्षातर्फे अभियोक्ता | ॲड. श्री. डी. सी. खोपडे. |
| आरोपी | **१. ज्ञानेश्वर दौलत तावरे,**<br>वय ३५ वर्ष, धंदा — शेती, |
| | **२. दत्तात्रय दौलत तावरे,**<br>वय ४५ वर्ष, धंदा — हमाली, |
| | **३. सविता दत्तात्रय तावरे,**<br>वय ३८ वर्ष, धंदा— हमाली,<br>सर्व आरोपी रा. मु.पो.जाभळी,<br>ता. हवेली, जि. पुणे |
| | **४. सुशिला दौलत तावरे, (मयत)**<br>रा. मु.पो.जाभळी, ता. हवेली, जि. पुणे<br>(नि.क्र.१ वरील आदेश दि.२१/०४/२०२६ अन्वये प्रस्तुतचे प्रकरण आरोपी क्र.४ विरूध्द अबेट करण्यात आले.) |
| आरोपींतर्फे विधिज्ञ | श्रीमती निता भवार |

**भाग 'ब'**

| | |
|---|---|
| गुन्हा घडला तारीख | २३/०६/२०१९ पासुन ते प्रथम खबरी अहवाल दाखल होईपर्यंत. |
| प्रथम खबरी अहवाल दिनांक | १६/१२/२०२० |
| दोषारोपपत्र केल्याचा दिनांक/दोषारोपपत्र निश्चित दिनांक | २१/०४/२०२६ |
| पुरावा सुरुवात दिनांक | २१/०४/२०२६ |

| | |
|---|---|
| कलम ३१३ फौ.प्र.सं. प्रमाणे आरोपींची जबानी नोंदविल्याचा दिनांक | — |
| युक्तीवादाची तारीख | २७/०४/२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी राखुन ठेवल्याचा दिनांक | — |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | २७/०४/२०२६ |
| आरोपीच्या शिक्षेबाबतचा दिनांक | — |

**(आरोपीचा तपशील)**

| अनु. क्र. | आरोपींची नावे | अटकेचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | कलम | दोषमुक्त केले किंवा शिक्षा सुनावली | शिक्षा काय दिली | अटक झाल्यापासून न्यायनिर्णया पर्यंत आरोपी कारागृहात होते का? असल्यास कलम ४२८ फौ.प्र.सं. नुसार सुट |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **ज्ञानेश्वर दौलत तावरे,** | १०/०७/२०२१ | नोटीस वर सोडले. | भा.द.वि. कलम ४९८(अ), ३२३, ५०४, ३४ अन्वये | निर्दोष मुक्त केले. | — | — |
| २. | **दत्तात्रय दौलत तावरे,** | | | | | | |
| ३. | **सविता दत्तात्रय तावरे,** | | | | | | |

**भाग 'क'**
**(अभियोगपक्षातर्फे/ आरोपीतर्फे/ न्यायालयातर्फे साक्षीदारांची यादी)**

| **अभियोगपक्षातर्फे साक्षीदार** | | |
|---|---|---|
| **साक्षीदार क्र.** | **नांव** | **पुराव्याचा प्रकार** |
| सा.क्र. १ | मोनिका ज्ञानेश्वर तावरे | फिर्यादी साक्षीदार |

| **आरोपीतर्फे साक्षीदार** | | |
|---|---|---|
| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
| — | — | — |

| **न्यायालयातर्फे साक्षीदार** | | |
|---|---|---|
| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
| — | — | — |

**(अभियोगपक्षातर्फे/आरोपीतर्फे/न्यायालयातर्फे निशाणी दिलेल्यांची यादी)**

**'अ' — अभियोगपक्षातर्फे —**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **कागदपत्राचे वर्णन** |
|---|---|---|
| १. | ०८ | फिर्यादीवरील सही |
| २. | ०९ | प्रथम खबरी अहवाल वरील सही |

**'ब' — आरोपीतर्फे —**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे वर्णन |
|---|---|---|
| — | — | — |

**'क' — न्यायालयातर्फे —**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे वर्णन |
|---|---|---|
| — | — | — |

**'ड' — महत्वाचे पुरावे —**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे वर्णन |
|---|---|---|
| — | — | — |

## न्या य नि र्ण य

(घोषीत दिनांक २७ एप्रिल, २०२६)

०१) आरोपींविरूद्ध भारतीय दंड संहीताचे कलम ४९८—अ, ३२३, ५०४ सह कलम ३४ अंतर्गत खटला ठेवण्यात आला आहे. आरोपी क्र.४ सुशिला दौलत तावरे यांचे मृत्यु प्रमाणपत्र नि.क्र.४ असल्याने त्यांचे विरूध्द नि.क्र.१ वरील आदेशाने प्रस्तुतचे प्रकरण अबेट करण्यात आले.

०२) अभियोग पक्षाचे असे कथन आहे की, फिर्यादी मोनिका ज्ञानेश्वर तावरे हिचे लग्न आरोपी क्र.१ ज्ञानेश्वर दौलत तावरे यांच्यासोबत हिंदु रितीरिवाजानुसार विवाह दि.२३/०६/२०१९ रोजी करून त्यानंतर फिर्यादी हे आरोपीच्या घरी नांदावयास गेली. आरोपी क्र.१ फिर्यादीचा पती आहे, आरोपी क्र.२ सासु आहे, आरोपी क्र.३ दीर आहे व मयत आरोपी क्र.४ ही जाउु आहे. सदर फिर्यादी व आरोपी

क्र.१ यांचा यापुर्वी वेगवेगळया व्यक्तिंतीशी विवाह झाला होता. त्यांनी घटस्फोटानंतरच दुसरे विवाह केले आहे. आरोपी क्र.१ हा ट्रॅक्टर चालक आहे व त्यांच्याकडे शेती आहे असे खोटे सांगुन त्यांनी लग्नासाठी फिर्यादीकडून रू.१०,०००/— घेतले होते. लग्नासाठी आरोपींनी सारखी गळ घालून तारखेच्या आधीच अचानक बोलावून विवाह केला. आरोपी क्र.१ हा कोणतेही कामधंदा करत नव्हता. आरोपी क्र.१ चा मोठा भाउु मयत झाल्याने त्याने फिर्यादीस, 'तु पांढ—या पायाची आहेस, तुझयाशी माझे भावाचे लग्न झाल्यामुळे माझा एक भाउु मेला' असे बोलून मानसिक त्रास देते होते. आरोपी क्र.१ ने काही दिवसानंतर फिर्यादीसोबत संबंध ठेवणे बंद केले त्याबाबत तिने विचारले असता आरोपी क्र.१ म्हणाला की, 'माझया अंगात देवीचे वारे आहे, त्यामुळे मी तुझयाशी शारिरिक संबंध ठेवू शकत नाही.' त्याबाबत तिने घरच्यांना सांगितले असता सासु, दिर व जाउु तिला म्हणाले की, 'तुझयामुळेच ज्ञानेश्वर बिघडला'. फिर्यादीची जाउु म्हणायची की, 'मी उगाचच माझे दिराशी तुझा लग्न लावून दिला, त्याला आम्ही आयुष्यभर असाच सांभाळला असता, तुझया मुळेच ज्ञानेश्वर असा वागतो' असे म्हणून फिर्यादीलाच दोष दिले. फिर्यादीने घरखर्चासाठी पैसे मागितले असता तिच्यासोबत वाद करून उलट तिलाच मारहान केली व फिर्यादी बेशुध्द पडली असता आरोपींनी फिर्यादीस घरी नेवुन ठेवले व तेथुन निघुन गेले. त्यानंतर फिर्यादीला हॉस्पीटलमध्ये ॲडमिट केले व त्याबाबत आरोपींना कळविले परंतु ते आले नाहीत. सदरचे बील साक्षीदार यांनीच भरले. फिर्यादी ही हॉस्पीटलनंतर काही दिवस त्यांच्या आईकडे राहून सासरी आली असता आरोपी क्र.१ म्हणाला की, 'तुम्ही हिला येथे कशाला आणले', 'माझया अंगात देवीचे वार आहे, मी तिला हात लावणार नाही, तु तिला सोबत घेवून जा.' फिर्यादी ही सासरी राहिली असता आरोपी क्र.१ म्हणाला की, 'मला घटस्पोट दे, मला तुझे सोबत राहायचे नाही' असे म्हणून मारहान केली. आरोपीं हे फिर्यादीस टोमणे मारून, शिविगाळ करून मारहान करत होते. आरोपी क्र.१ हे किरकोळ आजारात देखील त्यांना माहेरी सोडत असे व पुन्हा ने—आण करत असे. आरोपी क्र.१ ते ४ यांनी फिर्यादीस वेळोवेळी टोमणे मारून, शिविगाळ करून हाताने मारहान केली व तिचा शरिरिक व मानसिक छळ केला. त्यामुळे फिर्यादीने आरोपींविरुध्द **उत्तमनगर** पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिला.

०३) सदरिल फिर्यादीवरून **उत्तमनगर** पोलीस स्टेशन येथे अपराध क्रमांक **१२३७/२०२२** अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. सदर गुह्याचा तपास पोलीस उप—निरिक्षक श्री.ए.ई.दुगावकर, यांच्याकडे सोपविण्यात आला. तपासी अधिकारी यांनी तपासाच्या दरम्यान साक्षीदारांचे बयाण नोंदविले, आरोपींना सुचनापत्र दिले, आरोपींविरूध्द सबळ पुरावा मिळुन आल्याने त्यांच्याविरूध्द न्यायालयात भा.द.वि. चे कलम **४९८—अ, ३२३, ५०४ सह कलम ३४, ३२३, ५०४ सह कलम ३४** अन्वये दोषारोप दाखल करण्यात आले.

०४) आरोपी हजर झाल्यानंतर आरोपींविरुध्द भारतीय दंड संहीतेच्या कलम **४९८—अ, ३२३, ५०४ सह कलम ३४** अन्वये दोषारोप नि.क्र.**०२** ठेवला, जो आरोपींनी नाकबुल केला. आरोपी विरूध्द पुरावा न आल्याने फौ.प्र.सं.चे कलम ३१३ प्रमाणे आरोपीचा जबाब नोंदविण्यात आला नाही.

०५) खालील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित झाले, ते मी सकारण उत्तरासह दिले आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| ०१. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, दि.२३/०६/२०१९ ते आजपर्यंत फिर्यादीचे सासरी वेळोवेळी येथे आरोपींनी संगणमत करुन, फिर्यादीसोबत जाणूनबुजून शारिरिक संबंध न करून, फिर्यादी हिला शिविगाळ मारहान करून व इतर कारणांवरून फिर्यादीचा शारिरीक व मानसिक छळ केला का ? | **नकारार्थी** |
| ०२ | वरील नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी फिर्यादीस तिने तिच्या वडिलांना व आईला पैसे दिल्याच्या कारणावरून हाताने मारहान करून दुखापत केली, हे सिध्द केले काय ? | **नकारार्थी** |
| ०३ | वरील नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी फिर्यादीस शिविगाळ केली, हे सिध्द केले काय ? | **नकारार्थी** |
| ०४ | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारण मिमांसा

०६) अभियोग पक्षाने आरोपींविरूध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी फिर्यादी सा.क्र.१ मोनिका ज्ञानेश्वर वावडे यांची साक्ष **नि.क्र.०७** वर नोंदविली. अभियोग पक्षाच्या साक्षी पुराव्यांचे अवलोकन करण्यापुर्वी फिर्यादी व आरोपींमध्ये न्यायालयाबाहेर आपसी तडजोड झाली असल्याची बाब लक्षात घेणे आवश्यक आहे. फिर्यादीने गैरसमजूतीतुन आरोपींविरूध्द फिर्याद दाखल केली होती. परंतु तिला फिर्यादमधील मजकूर आठवत नाही. अभियोग पक्षाने नोंदविलेल्या साक्षीदारांच्या साक्षीमध्ये आरोपींविरूध्द कोणताही गुन्हादर्शक पुरावा अभिलेखावर आलेला नसल्यामुळे आरोपींचे फौजदारी प्रक्रीया संहीता कलम ३१३ अन्वये आरोपीचे जवाब नोंदविण्यात आले नाही. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

**मुद्दा क्रमांक १ ते ३ करीता** :—

०७) या प्रकरणात तपासण्यात आलेले महत्वपूर्ण साक्षीदार फिर्यादी (सा.क्र.१) हिने तिच्या साक्ष सरतपासात कथन केले की, आरोपी क्र.१ ज्ञानेश्वर दौलत तावडे हे तिचे पती आहे. आरोपी क्र.२ दत्तात्रय हा तिचा दिर आहे. आरोपी क्र.३ सविता ही तिची जाउुबाई आहे. आरोपी क्र.४ सुशिला दौलत तावरे ही तिची सासु आहे व त्या मयत आहेत. आरोपी क्र.१ सोबत तिचा विवाह जुन २०१९ मध्ये आळंदी, पुणे येथे हिंदू रितिरिवाजाप्रमाणे झाले. लग्नानंतर ती जांभळी गांव, ता.हवेली येथे नांदण्यास गेली तेथे ती ६ महिणे चांगली नांदली. तिच्यात व आरोपी क्र.१ ते ४ मध्ये किरकोळ वाद झाले. त्यानंतर सुध्दा तिला त्रास सुरू होता. त्यानंतर ती माहेरी आली. त्यानंतर तिने तक्रार उत्तमनगर येथे दिली. फिर्याद वरील फिर्यादीची सही नि.क्र.८ वर आहे. फिर्याद मधील मजकूर खरा व बरोबर नाही. प्रथम खबर अहवाल वरील सही तिचीच आहे. सदर सही नि.क्र.९ वर आहे. फिर्याद मधील मजकूर खरा व बरोबर नाही.

०८) उलटतपासात तिने कथन केले की, तिने मान्य केले की, पोलीस आयुक्तांना दिलेला अर्जातील मजकूर तिला आठवत नाही. त्यावर तिची सही आहे. सही नि.क्र.१० वर आहे. आरोपी क्र.१ व त्यांच्यात घटस्पोट मंजूर झाला आहे. प्रस्तुतचे प्रकरण

मा. दिवाणी न्यायालय व.स्तर येथे निकाली निघाले आहे. पोलींसांची व त्यांची ओळख नाही. अर्जात नमुद केलेला भ्रमणध्वनी नंबर तिचा आहे. तिला तिच्या जबाबातील अधोरेखांकित भाग अ खरा व बरोबर असल्याचे सांगितले. तसेच जबाबातील अधोरेखांकित भाग ब खरा व बरोबर नसल्याचे सांगितले. तसे माझे जबाबात का लिहिले आहे याचे कारण त्यांना सांगता येत नाही. आरोपींनी तिला शारिरिक व मानसिक त्रास दिला म्हणून त्यांनी आरोपींविरूध्द खोटी तक्रार दाखल केली. आरोपी क्र.४ मयत आहे त्याचा मृत्युदाखला नि.क्र.४ वर अभिलखावर दाखल आहे. आरोपी क्र.१ ते ३ व त्यांच्यात न्यायालयाबाहेर तडजोड झाली आहे. तडजोड पुरसीस मधील मजकूर खरा व बरोबर असुन त्यावर तिची व आरोपींची सही आहे. फिर्यादीचे विधिज्ञ तेजस्विनी खुल्लट यांनी फिर्यादीस ओळखले. आरोपींचे विधिज्ञ श्रीमती निता भवार यांनी आरोपीस ओळखले.

०९) फिर्यादी व आरोपींमध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झाली असल्याने तडजोड पुरशिस नि.क्र.६ वर दाखल करण्यात आली आहे. तसेच पुरावा बंद पुरसिस नि.क्र.११ वर दाखल केले आहे. फिर्यादी व आरोपींमध्ये आपसी तडजोड झाली आहे. फिर्यादीने फिर्यादीतील कथनांशी विसगंत असा साक्षी पुरावा दिलेला आहे. त्यामुळे अभिलेखावरील फिर्याद सिध्द झाली नाही. उलट सदर साखीदारांनी उलटतपासात आरोपी क्र.१ ते ४ यांनी फिर्यादीचा शारीरीक व मानसिक छळ उपाशी ठेवुन केला नसल्याचे मान्य केले. त्यामुळे मी मुददा क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.४ करीता :—</u>**

१०) उपरोक्त कारणीमिमांसेवरुन हे स्पष्ट होते की, अभियोग पक्षाने आरोपींविरुध्द ठेवलेले दोषारोप शाबीत केले नाहीत. त्यामुळे आरोपींना निर्दोष मुक्त पात्र ठरले आहे. फिर्यादीने उलटतपासणीमध्ये दिलेले कथन फिर्यादीमधील कथनाशी विसंगत आहे. आपसी तडजोड झाल्यामुळे फिर्यादीने अशी भूमिका घेतली व आता त्याला आरोपींविरोधात कसलीही तक्रार नाही. त्यामुळे फिर्यादीविरोधात खोटी फिर्याद दिल्यामुळे कारवाई करणे उचित होणार नाही. म्हणून येणेप्रमाणे अंतिम आदेश देण्यात येत आहे,

## आ दे श

१) आरोपी क्र.**१. ज्ञानेश्वर दौलत तावरे, २. दत्तात्रय दौलत तावरे व ३. सविता दत्तात्रय तावरे** यांना भारतीय दंड विधान कलम ४९८—अ, ३२३, ५०४ सह कलम ३४ अन्वयेच्या गुन्ह्यातून फौजदारी प्रक्रीया संहिता कलम २४८(१) नुसार निर्दोष मुक्त करण्यात येते.

२) आरोपींचे जामीनबंधपत्रे रद्द करण्यात येतात.

३) फौजदारी प्रक्रीया संहिता कलम ४३७ (अ) प्रमाणे आरोपीने जात मुचलका कदबा रु.१५,०००/— प्रत्येकी देऊन त्याची पुर्तता करावी. सदरील जात मुचलका कदबा हा सहा महिन्यांचे कालावधीनंतर आपोआप रद्द होईल.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात उद्घोषीत करण्यात आला.)**

GAJANAN RAMRAO DORNALPALLE
Digitally signed by GAJANAN RAMRAO DORNALPALLE
Date: 2026.04.27 17:33:07 +0530

पुणे
दिनांक: २७/०४/२०२६

**(डॉ. जी. आर. डोरनालपल्ले)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
न्यायालय क्र.१, पुणे.

# **प्रमाणपत्र**

या पी.डी.एफ फाईल जजमेंट/ऑर्डरमधील मजकुर खरा असुन तो मुळ जजमेंट/ऑर्डर प्रमाणे खरा आहे.

लघुलेखकाचे नांव — एम एस झाडे —श्रेणी ३

पिठासीन अधिकारी नांव — **डॉ.जी. आर. डोरनलपल्ले**
कोर्टाचे नांव — न्यायालय क्र.१, पुणे

निकाल दिनांक जजमेंट/आदेश — २७/०४/२०२६
जजमेंट/आदेश
पिठासीन अधिकारी यांनी सही केलेला दिनांक २७/०४/२०२६

जजमेंट/आदेश अपलोड केलेला दिनांक २७/०४/२०२६